# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ४०१-२०२४ दिनांक :- २८/१०/२०२४

## “बनावट मोबाईल धारकांकडुन फसवणुक केलेल्या तक्रारदार यांना एकुण ७८,४००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश ”

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील नवघर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे श्री. पांडे फॅशन शो करीता प्रोसेस करण्याचे सांगुन ऑनलाईन रक्कमेची फसवणुक झाली होती. तसेच आचोळे पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे श्रीमती. फर्नांडिस यांची ऑनलाईन इंन्शुरन्स पॉलीसी रिन्युव्ह करण्याचे सांगुन ऑनलाईन आर्थिक फसवणुक झाल्याने नमुद तक्रारदार यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १९८४ -बी/२०२४ व १६८३- बी /२०२४)**

तक्रारदार यांची ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा.न्यायालय यांचेकडे फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता पाठपुरावा करुन वरील तक्रारदार यांची **फसवणुक झालेली ७८,४००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **अनोळखी मोबाईल धारकास आपली वैयक्तिक माहिती उघड करु नये.**
- **बँकेचे अधिकारी फोन करुन बँक खात्याची अगर वैयक्तिक माहितीबाबत विचारणा करत नाही. तरी बँकेतुन बोलत असल्याचे सांगत असल्याणा-या फोनधारकास आपली माहिती देवु नये.**
- **कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय आपले मोबाईलमध्ये डाऊनलोड करुन नये, त्यामुळे आपली फसवणुक होण्याची शक्यता असते.**
- **facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर प्राप्त Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **बँक खाते, पॉलीस रिन्युव्ह, क्रेडिट कार्ड याबाबत काही अडचणी असल्यास बँकेत समक्ष जावुन पुर्तता करावी.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ , सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/ सावन शेवाळे, पोअं/प्रशांत बोरकर, मपोहवा/माधुरी धिंडे सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**